**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**विधान भवन, मुंबई- ४०० ०३२**
**क्रमांक : १८३३९ / क-१**
**दिनांक : ३० डिसेंबर, २०२०**

**संदर्भ :-**१) कार्यालयीन परिपत्रक क्र.४१२०६/क-१, दिनांक १० ऑगस्ट, २००६
२) कार्यालयीन परिपत्रक क्रमांक २१९०८/क-१, दिनांक १३ मे, २०१०
३) कार्यालयीन परिपत्रक क्र८६००/क-१, दिनांक ८ मे, २०१९

## : : परिपत्रक : :

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५(१), (२) व १९ मधील तरतुदीअन्वये या सचिवालयास प्राप्त होणाऱ्या अर्जावर त्वरेने निपटारा होण्यासाठी या सचिवालयात कक्षनिहाय अपिलीय प्राधिकारी, माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सर्व कक्षांकडील माहितीच्या अधिकाराच्या कामकाजात समन्वय, सुसंगती व एकसुत्रिपणा राहण्यासाठी अपिलीय प्राधिकारी(समन्वय), माहिती अधिकारी(समन्वय) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त झालेल्या 'अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक कक्षांतर्फे हाताळण्यात येणाऱ्या विषयांशी संबंधित असेल तर अर्जदारास अंतिमत: एकत्रित स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची जबाबदारी ही माहिती अधिकारी (समन्वय) यांनी निश्चित करुन दिलेल्या संबंधित कक्षाच्या माहिती अधिकाऱ्याची राहील' असे संदर्भाधीन परिपत्रकांन्वये या सचिवालयातील सर्व कक्षांना कळविण्यात आले आहे.

तथापि, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त काही अर्जातील माहिती ही वेगवेगळया कक्षांमार्फत हाताळण्यात येणाऱ्या विषयांशी निगडीत असल्यास, अर्जदारास अंतिमत: एकत्रित स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीची जबाबदारी टाळण्यासाठी काही कक्षातील माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी वेगवेगळया सबबींवर मुळ अर्ज स्वत:च्या कक्षाकडे घेण्यास नकार देतात अथवा वरिष्ठ अधिकाऱ्याचे आदेश घेऊन माहितीच्या अधिकाराचा अर्ज अन्य कक्षांकडे हस्तांतरित करण्यासाठी पुन:श्च समन्वय कक्षाकडे परत पाठवितात ही बाब निश्चित उचित नसून माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जदारास विहित कालावधीत माहिती देणे बंधनकारक असल्याने अर्ज स्वीकरण्यास होणाऱ्या टाळाटाळीमुळे किंवा अर्ज घेण्यास नकार दिल्यामुळे यामध्ये कालापव्यय होऊन अर्जावरील कार्यवाहीस विलंब होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे समन्वय कक्षातील माहिती अधिकारी ब सहायक माहिती अधिकारी यांना प्राप्त अर्जावरील कार्यवाही विहित मुदतीत पुर्ण करणे कठीण जात आहे.

सबब, 'यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये प्राप्त अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक कक्षांतर्फे हाताळण्यात येणाऱ्या विषयाशी संबंधित असेल तर अर्जदारास अंतिमतः एकत्रित स्वरुपात माहिती उपलब्ध करुन द्यावयाची जबाबदारी ही माहिती अधिकारी(समन्वय) यांनी निश्चित करुन दिलेल्या संबंधित कक्षाच्या माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांचीच राहील.' तथापि, माहिती अधिकारी(समन्वय) कक्षाद्वारे पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेल्या मूळ अर्जातील माहिती अन्य कक्षाशी संबंधित आहे असे वाटल्यास त्या कक्षांनी अन्य कक्षाकडे त्यांच्या स्तरावर परस्पररित्या तो अर्ज हस्तांतरित करावा. मात्र तो पुनःश्च माहितीचा अधिकार(समन्वय) कक्षाकडे परत पाठविण्यात येऊ नये तसेच अर्ज हस्तांतरित केल्याची माहिती माहितीचा अधिकार (समन्वय) कक्षास देण्यात यावी.

( राजेन्द्र भागवत )
सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

१) या सचिवालयातील सर्व अधिकारी
२) या सचिवालयातील सर्व कक्ष